# प्रतिज्ञापत्र

"अनंत मनोहर यांच्या **'देवकाठी'**, **'बिल्वपत्र'** आणि **'कर्कोटक'** या कथासंग्रहांचा अभ्यास" ह्या विषयावरील प्रस्तुत प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल. (मराठी) पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे. ही प्रबंधिका अथवा हिचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही या व इतर विद्यापीठात कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ- कोल्हापूर.

दिनांक

**(कांबळे वैशाली अशोक)**

संशोधक

# शिफारस पत्र

**प्रा. डॉ. ब. ना. तुरंबेकर**
प्रपाठक व मराठी विभाग प्रमुख,
डी. आर. माने महाविद्यालय,
कागल.

कु. वैशाली अशोक कांबळे यांनी "अनंत मनोहर यांच्या 'देवकाठी', 'बिल्वपत्र' आणि 'कर्कोटक' या कथासंग्रहांचा अभ्यास" या विषयावरील शोधप्रबंधिकेचे लेखन माझ्या मार्गदर्शनाखाली समाधानकारकपणे पूर्ण केले आहे. यातील विवेचन स्वतंत्र आहे. शोध प्रबंधिकेतील मजकुराचा वापर त्यांनी यापूर्वी अन्यत्र व इतर विद्यापीठात कोठेही केलेला नाही.

ही शोधप्रबंधिका शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना एम. फिल. परीक्षेच्या संदर्भात परीक्षणासाठी सादर करावी यासाठी मी संमती दिली आहे.

**स्थळ- कोल्हापूर**

दिनांक -८/१०/२०१०

**(प्रा. डॉ. ब. ना. तुरंबेकर)**
(संशोधन मार्गदर्शक)

## मनोगत

शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. (मराठी) परीक्षेसाठी "अनंत मनोहर यांच्या 'देवकाठी', 'बिल्वपत्र' आणि 'कर्कोटक' या कथासंग्रहांचा अभ्यास" या विषयावरील प्रबंधिका सादर करीत असताना मला अतिशय आनंद होत आहे.

अनंत मनोहर हे १९६० नंतरचे एक महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांचे वाङ्मय आधुनिक जीवनाचे वास्तवदर्शन घडविणारे आहे. त्यांनी कादंबरी आणि कथा या दोन वाङ्मयप्रकारांत बरेच लेखन केलेले आहे. अनंत मनोहरांचे वाङ्मय अनेक वाङ्मयीन गुणवैशिष्ट्यांनी संपन्न आहे. त्यांच्या कथेत सामाजिकता, चिंतनशीलता, मानवी जीवनातील विविध समस्यांचे चित्रण येते. त्यामुळे त्यांच्या 'देवकाठी', 'बिल्वपत्र' आणि 'कर्कोटक' या तीन कथासंग्रहांचा अभ्यास करण्याचे योजिले आहे.

माझ्या प्रबंधिकेला डॉ. तुरंबेकर ब. ना. मला मार्गदर्शक म्हणून लाभले. त्यांच्याविषयी मी कृतज्ञता व्यक्त करते. त्यांचा प्रेमळ सहवास आणि मराठी साहित्याचा व्यासंग यातून मी खूप काही शिकले. माझ्या कौटुंबिक आणि शैक्षणिक अडचणीला समजावून घेतले. त्यांच्याविषयी मी कायमच ऋणी राहण्यात आनंद मानते.

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. कृष्णा किरवले, डॉ.रवींद्र ठाकूर, अन्य सहकारी प्रा. हिमांशू स्मार्त ह्यांचे बहुमोल असे मार्गदर्शन मिळाले. तसेच विभागातील लिपिक विनय पाटील सर यांनी वेळोवेळी योग्य ते सहकार्य केले. त्यांचेही ऋण व्यक्त करते. ह्या सर्वांची मी ऋणी आहे.

माझे तीर्थस्वरूप अप्पा व मम्मी, बंधू प्रा. योगेश, राकेश व बहीण योगिता तसेच माझे श्रद्धास्थान असणारे वडणगेकर आत्या व मामा यांनी मला शिक्षणासाठी प्रेरणा दिली. त्यांची मी शतश: ऋणी आहे. माझे पती प्रा. अमोल कांबळे व माझे सासू- सासरे यांनी मला माझा प्रबंध सादर करताना मोलाचे सहकार्य केले.

ही प्रबंधिका पूर्ण करण्यामध्ये सहकार्य करणारे टंकलेखक श्री. सचिन सवदी (महालक्ष्मी एंटरप्राइजेस, इचलकरंजी) यांनी जास्तीत जास्त अचूक व वेळेवर काम पूर्ण करून दिल्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

**स्थळ- कोल्हापूर**

दि.

**कांबळे वैशाली अशोक**

# -अनुक्रमणिका-

## अनंत मनोहर यांच्या 'देवकाठी', 'बिल्वपत्र' आणि 'कर्कोटक' या कथासंग्रहांचा अभ्यास



| प्रकरण | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| प्रकरण पहिले | साठोत्तरी मराठी वाङ्मयातील कथालेखन आशय आणि आविष्कार. | १-३४ |
| प्रकरण दुसरे | अनंत मनोहर यांच्या साहित्याचे स्वरूप आणि वेगळेपण. | ३५-५६ |
| प्रकरण तिसरे | 'देवकाठी' आणि 'बिल्वपत्र' या दोन कथासंग्रहांचा आशय आणि अभिव्यक्तिदृष्ट्या विचार. | ५७-१२१ |
| प्रकरण चौथे | 'कर्कोटक' या कथासंग्रहाचा आशय आणि अभिव्यक्तिदृष्ट्या विचार | १२२-१६३ |
| प्रकरण पाचवे | अनंत मनोहर यांच्या प्रस्तुत कथातील व्यक्तिचित्रणे आणि सामाजिक संदर्भ यांचा विचार | १६४-१९० |
| प्रकरण सहावे | उपसंहार | १९१-१९८ |
| | अ) आधार ग्रंथ सूची | १९९ |
| | आ) संदर्भ ग्रंथ सूची | १९९-२०१ |